MHKO100007182013

## रे.क.नं. २००/२०१३ मधील निशाणी क्र.८२ वरील आदेश
## (वसंत कुरळे वि. सिदगोंडा पाटील)

**१.** वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.२ शिवगोंडा उर्फ फदू सातगोंडा पाटील यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.२ शिवगोंडा उर्फ फदू सातगोंडा पाटील हे दिनांक १६/०६/२०२५ रोजी मयत झाले आहेत. वादी यांचे वडील वयस्कर असून त्यांना पॅरालिसिसचा आजार असल्याने त्यांना हिंडता फिरता येत नाही. त्यांच्या सेवेसाठी त्यांना घरीचे थांबावे लागते. प्रस्तुतकामी वारस रेकॉर्डवर आणणेसाठी विलंब झालेला आहे. प्रतिवादी क्र.२ चे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी टाळाटाळ केलेली नाही. वारसांना मुदतीत रेकॉर्डवर आणावे लागते याचे ज्ञान नव्हते. सबब प्रतिवादी क्र. २ विरूध्द झालेला अबेटमेंटचा हुकूम रद्द व्हावा.

**२.** प्रतिवादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे असे कथन आहे की, अर्जातील मजकूर धांदात खोटा आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

**३.** वादी यांचा अर्ज वाचला. प्रतिवादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे सादर केले आहे. दोन्ही बाजुचे विधीज्ञ यांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

**४.** वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द हक्कज्ञापन व कायम मनाई मिळण्याकरीता दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे.

सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी क्र.२ शिवगोंडा उर्फ फदू सातगोंडा पाटील यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. त्याकरीता प्रतिवादी क्र. २ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ होणे व अबेंटमेंट आदेश रद्द होणे गरजेचे आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2025.12.01 17:29:06 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक ०१/१२/२०२५

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज